**विशेष सखोल पुनरिक्षण (Special Intensive Revision) २०२६**
**वारंवार विचारले जाणारे प्रश्न (Frequently Asked Questions)**

**प्रश्न १: विशेष सखोल पुनरिक्षण (SIR)म्हणजे काय व ते राबविण्याचा उद्देश काय आहे?**
उत्तर: राज्यातील विधानसभा मतदार संघाच्या मतदार याद्या दोषविरहीत व अचूक करण्यासाठी नव्याने मतदार याद्या तयार करणे म्हणजेच विशेष सखोल पुनरिक्षण होय. सन २००२-२००४ या कालावधीत देशात मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण करण्यात आले होते. त्यानंतर वाढते शहरीकरण, नागरिकांचे स्थलांतरण, मतदारांचा मृत्यु, दुबार नावे इत्यादी कारणांमुळे मतदार याद्या नव्याने तयार करण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. त्यामुळे पुर्ण देशामध्ये हा कार्यक्रम टप्प्याटप्प्याने राबविण्यात येत आहे.

**प्रश्न २: हा कार्यक्रम कधी राबविला जाणार आहे?**
उत्तर : भारत निवडणूक आयोगाच्या सुधारित वेळापत्रकानुसार हा कार्यक्रम महाराष्ट्रात दि. ३० जून, २०२६ ते १९ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत निवडणूक आयोगाचे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (Booth Level Officer) दि. ३०.०६.२०२६ ते ०८.०८.२०२६ या कालावधीत मतदाराच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन गणना प्रपत्र (Enumeration Form)भरुन घेणार आहेत.त्या नंतर दि. १७ ऑगस्ट, २०२६ रोजी प्रारुप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. दि. १७ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर, २०२६ या कालावधीत सदर याद्यांच्या अनुषंगाने दावे व हरकती स्विकारण्यात येतील. दि. १७ ऑगस्ट ते १५ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत नोटिसा देणे व त्याबाबतची कार्यवाही तसेच्प्र दावे व हरकतींच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल व दि. १९ ऑक्टोबर, २०२६ रोजी अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात येईल.

**प्रश्न ३: गणना प्रपत्रामध्ये कोणती माहिती भरावयाची आहे?**
उत्तर: गणना प्रपत्रामध्ये मतदाराची सध्याच्या मतदार यादीतील माहिती पहिल्या भागात नमूद असणार आहे. दुस-या भागात दोन कप्पे आहेत. मतदाराचे स्वत:चे नाव व अन्य तपशिल मागील SIR च्या यादीत सापडले असतील (स्व:जुळवणी किंवा self-mapping) तर ते पहिल्या कप्प्यात भरता येतील . मतदाराचे असे तपशिल नसतील तर त्याच्या आई-वडील/ आजी-आजोबा यांचे मागील SIRच्या यादीतील तपशिल (नातेवाईकांशी जुळवणी किंवा progeny mapping) दुस-या कप्प्यात भरता येतील. तिस-या भागात मतदाराची जन्म तारिख, मोबाईल क्र.,आधार क्र. वडील/आई यांची नावे ईत्यादि माहिती भरावयाची आहे व प्रपत्राच्या शेवटी मतदाराने किंवा मतदाराच्या कुटुंबातील प्रौढ सदस्याने स्वाक्षरी करुन किंवा डाव्या हाताच्या आंगठ्याचा ठसा लावून सदर गणना प्रपत्र BLO कडे द्यावयाची आहे.

**प्रश्न ४: देशामध्ये मागील विशेष सखोल पुनरिक्षण कधी घेण्यात आले होते?**
**उत्तर:**देशामधील विविध राज्यांमध्ये वेगवेगळया टप्प्यात २००२ ते २००४ या कालावधीत विशेष सखोल पुनरिक्षण घेण्यात आले होते.

**प्रश्न ५: आताच्या पुनरिक्षण कार्यक्रमात मागील SIR ची माहिती का घेतली जात आहे?**
उत्तर: संविधान व कायद्यातील तरतुदीनुसार भारताच्या कोणत्याही मतदारसंघाच्या मतदार यादीत नाव समाविष्ट होण्याकरिता संबंधित व्यक्ती भारताचा नागरीक असणे अनिवार्य आहे. सन २००२-२००४ या कालावधीत झालेल्या विशेष पुनरिक्षणामध्ये तयार करण्यात आलेल्या मतदार याद्यांमध्ये नाव असणे ही बाब संबधित मतदाराचा जन्म १ जुलै १९८७ पुर्वी झाल्याचे दर्शविते, जी तारिख Citizenship Act मधिल पहिली cut-off date आहे.

**प्रश्न ६: यामध्ये मतदारांकडुन काय अपेक्षित आहे?**
उत्तर: सध्याच्या सुमारे ७६ टक्के मतदारांची मागील SIR मधील नावातील नोंदींशी जुळवणी करण्याची कार्यवाही यापूर्वीच करण्यात आली आहे.मतदान केंद्रस्तरीय अधिकारी घरभेटीच्या वेळी संबंधित मतदाराला किंवा त्याच्या कुटुंबातील उपस्थित प्रौढ व्यक्तिला ही माहिती दाखवेल व संबंधित मतदाराने/ कुटुंबातील व्यक्तिने माहिती बाबतची

खातरजमा केल्यानंतर ती माहिती गणना प्रपत्रात नमूद करेल व संबंधित मतदार/ व्यक्तीचे नाव व अन्य काही माहिती नमूद करुन गणना अर्जावर स्वाक्षरी घेईल. भरलेल्या अर्जाची एक प्रत मतदाराला देण्यात येईल.

**प्रश्न ७: ज्या मतदारांची मागील SIR मधील नोंदीशी जुळवणी (Mapping) झालेली नसेल तर अशा प्रकरणी काय कार्यवाही अपेक्षित आहे?**

उत्तर: मतदान केंद्रस्तरीय अधिकारी अशा मतदाराला त्याच्या २००२ मधील निवासासंदर्भातीलमाहिती (उदा. राज्य, जिल्हा, मतदारसंघ किंवा तालुका) विचारेलव त्याआधारे भारत निवडणूक आयोगाच्या ECINet ॲपकिंवा https://voters.eci.gov.in/या संकेतस्थळावरुन त्यांची मागील SIR मधील माहिती उपलब्ध करुन घेऊ शकेल. मतदार स्वत: सुध्दा BLO च्या घरभेटीच्या आधी ही माहिती वरील ॲप /संकेतस्थळावरुन संकलित करुन ठेऊ शकेल.

**प्रश्न ८: BLO च्या घरभेटीच्या वेळी मतदार किंवा त्याच्या कुटुंबातील कोणतेही प्रौढ सदस्य घरी उपलब्ध नसतील तर अशा व्यक्तीचे गणना प्रपत्र कसे भरुन घेता येईल?**

उत्तर: मतदार यादीमध्ये नमुद पत्त्यावर BLO भेट देईल. पहिल्या भेटीत संबंधित मतदार किंवा त्यांच्या कुटुंबातील कोणत्याही प्रौढ सदस्याची भेट न झाल्यास किंवा सदर घर बंद अवस्थेत असल्यास BLO चा दुरध्वनी क्रमांक दर्शविणारे कागदपत्र (Document) घरात/दरवाजात सरकवून ठेवण्यात येईल. संबंधित मतदार त्या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करुन सोयीस्कर वेळ कळवु शकेल, ज्यायोगे गणना प्रपत्र भरुन देण्याची कार्यवाही पुर्ण करण्यात येईल. तथापि, अशा प्रकारे प्रतिसाद न मिळाल्यास संबंधित BLO आणखी दोन वेळा घरी भेट देईल.

**प्रश्न ९: तीन गृहभेटीच्या नंतरही मतदाराच्या अनुपस्थितीमुळे किंवा घर बंद असल्यामुळे गणना प्रपत्र भरुन घेता न आल्यास काय होईल?**

उत्तर: अशा प्रकरणी अंतिम भेटीच्या वेळी मतदार अनुपस्थित (Absent)किंवा त्या ठिकाणावरुन स्थलांतरित झाल्याबाबत निदर्शनास आल्यास तशी कागदोपत्री नोंद ठेवण्यात येईल व गणना प्रपत्रावर नोंद घेण्यात येईल. अशा मतदारांची नावे प्रारुप मतदार यादीमध्ये समाविष्ट होणार नाहीत.

**प्रश्न १०: मृत व्यक्तीच्या गणना प्रपत्रावर काय कार्यवाही करण्यात येईल?**

उत्तर: मतदार यादीतील सर्व मतदारांसाठी गणना प्रपत्र तयार होतील. गृहभेटीदरम्यान त्यापैकी ज्या मतदारांचे निधन झालेले असेल त्याबाबत संबंधित मतदाराच्या नातेवाईकांकडुन प्राप्त माहितीच्या आधारे नोंद घेण्यात येईल व सदर गणना प्रपत्र “Uncollected”या प्रवर्गात मृत या संज्ञेखाली जमा करुन ठेवण्यात येईल व सदर नाव मतदार यादीत समाविष्ट होणार नाही.

**प्रश्न ११: एखाद्या मतदाराचे एकापेक्षा दोन ठिकाणी नाव नोंदविलेले असेलअशा मतदाराच्या गणना प्रपत्राबाबत काय काळजी घेण्यात येईल?**

उत्तर: लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० च्या कलम १७ व १८ येथिल तरतुदीनुसार एखाद्या व्यक्तीला एका पेक्षा जास्त आपले नाव मतदार यादीत नोंदविता येत नाही. तसेच, याच अधिनियमाच्या कलम ३१ नुसार मतदार यादीच्या पुनरिक्षणाच्या अनुषंगाने तसेच मतदार यादीतील नोंदीच्या अनुषंगाने चुकीचे विधान किंवा घोषणा करणा-या व्यक्तीस एक वर्षापर्यंतचा कारावास किंवा/ आणि दंड ही शिक्षा होऊ शकते. राज्यामध्ये ज्या मतदारांची एकापेक्षा जास्त ठिकाणी नावे असतील अशा नावांच्या नोंदी (photo-simillar entries) BLO कडे उपलब्ध करुन दिल्या आहेत. मतदार सध्या राहत असलेल्या ठिकाणचे गणना प्रपत्रच मतदाराने भरुन व सही करुन द्यावयाचे आहे. दुसऱ्या ठिकाणच्या गणना प्रपत्रावर Already Enrolled असे नमूद केले जाईल व त्यामुळे त्या ठिकाणी त्याचे समाविष्ट होणार नाही. एका पेक्षा जास्त ठिकाणी आपले गणना पत्र भरुन दिले जाणार नाही, याची दक्षता संबधित मतदाराने घेणे आवश्यक आहे.

**प्रश्न क्र.१२: मतदाराच्या गृहभेटीच्या वेळी गणना प्रपत्राशिवाय अन्य कोणते कागदपत्र मतदाराला द्यावे लागतील?**
उत्तर: मतदाराला गणना प्रपत्र भरुन व त्यावर स्वाक्षरी करुन द्यावा लागेल. ज्याचे मागील SIR मधील नोंदीशी मॅपिंग किंवा जुळवणी झालेली नसेल त्याला आयोगाने विहित केलेल्या दस्ताऐवजापैकी एक वैध दस्ताऐवज शोधून ठेवावे लागेल.

**प्रश्न क्र. १३: मतदाराला आपले नवीन छायाचित्र उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे काय?**
**उत्तर:** गणना प्रपत्रामध्ये मतदाराच्या सध्याच्या माहितीमध्ये त्याचे मतदार यादीतील छायाचित्र सुध्दा उपलब्ध आहे. मतदारास आपले नवीन छायाचित्र द्यावयाचे असल्यास किंवा मतदार यादीत दिसणारे छायाचित्र अस्पष्ट स्वरुपाचे अथवा अप्रमाणित स्वरुपाचे असल्यास संबंधित मतदार आपले नवीन छायाचित्र देऊ शकतो.

**प्रश्न क्र.१४: मतदाराला गणना प्रपत्रामध्ये आपला मोबाईल क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे काय?**
उत्तर: गणना प्रपत्रामध्ये मोबाईल क्र. नमुद करण्यासाठी रकाना देण्यात आला आहे. मोबाईल क्रमांक देणे अनिवार्य नसले तरी मोबाईल क्रमांक उपलब्ध करुन दिल्यास भविष्यात ऑनलाईन पध्दतीने यादीमधील दुरुस्तीसाठी अर्ज करणे, डिजिटल EPIC (मतदार ओळखपत्र) डाउनलोड करणे आणि इतर ऑनलाइन सेवा पुरविणे अधिक सोपे होईल.

**प्रश्न क्र.१५: मतदाराला गणना प्रपत्रामध्ये आपला आधार क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे काय?**
उत्तर: गणना प्रपत्रामध्ये मतदार ऐच्छिकतेने आपला आधार क्रमांक नमुद करु शकतात.

**प्रश्न क्र.१६: समजा एखाद्या मतदाराची २००२ मधील मतदार यादीतील नोंदीशी जुळवणी(Mapping) झाली नसेल किंवा करता आले नाही अशा मतदाराच्या गणना प्रपत्राचे काय होईल?**
उत्तर: अशा मतदाराने देखील आपला गणना प्रपत्र सही करुन BLO कडे द्यावयाचा आहे. त्याचे नाव प्रारुप मतदार यादीत समाविष्ट होईल. तथापि, त्यानंतर त्याला आयोगाने निश्चित केलेल्या पुराव्यापैकी एक पुरावा उपलब्ध करुन देण्यास कळविण्यात येईल.सदर पुरावा उपलब्ध करुन दिल्यानंतर व आवश्यकतेनुसार सुनावणी घेतल्यानंतरत्याअनुषंगाने मतदार नोंदणी अधिकारी यांची खात्री झाल्यास त्याचे नाव अंतिम मतदार यादीत समाविष्ट होऊ शकेल.

या प्रक्रियेसाठी प्रत्येक मतदार नोंदणी अधिकारी (ERO) यांच्यासोबत 5 ते 15 सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी (AERO) नियुक्त करण्यात आले आहेत. त्यामुळे मतदारांना सुनावणीसाठी दूरवर प्रवास करण्याची गरज भासणार नाही.

**प्रश्न क्र.१७: आयोगाने ठरवुन दिलेल्या पुराव्यांमध्ये कोणत्या कागदपत्रांचा समावेश आहे?**
**उत्तर:** SIR मार्गदर्शक सूचनांमध्ये खालील 1२ प्रकारची कागदपत्रे नमूद आहेत:

१. केंद्र किंवा राज्य शासन अथवा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांतील (PSU) नियमित कर्मचारी किंवा निवृत्तीवेतनधारक यांना जारी करण्यात आलेले ओळखपत्र किंवा निवृत्तीवेतन देयक आदेश (Pension Payment Order - PPO)
२. दिनांक1 **जुलै** 1987पूर्वी शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, बँका, टपाल विभाग, एलपीजी (LPG) वितरक संस्था किंवा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (PSU) यांनी जारी केलेले कोणतेही ओळखपत्र, प्रमाणपत्र किंवा दस्तऐवज
३. सक्षम प्राधिकाऱ्याने जारी केलेला जन्म दाखला
४. पासपोर्ट
५. मान्यताप्राप्त शिक्षण मंडळ किंवा विद्यापीठाने जारी केलेले दहावी (मॅट्रिक) उत्तीर्ण प्रमाणपत्र किंवा इतर कोणतेही शैक्षणिक प्रमाणपत्र
६. सक्षम राज्य प्राधिकाऱ्याने जारी केलेले कायमस्वरूपी निवासी प्रमाणपत्र (Permanent Residence Certificate)
७. वनहक्क प्रमाणपत्र (Forest Rights Certificate)
८. सक्षम प्राधिकाऱ्याने जारी केलेले इतर मागास वर्ग (OBC), अनुसूचित जाती (SC) किंवा अनुसूचित जमाती (ST) यांचे जात प्रमाणपत्र

९. लागू असल्यास राष्ट्रीय नागरिक नोंदणी (National Register of Citizens NRC) मधील नोंद
१०. राज्य शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांनी तयार केलेली कुटुंब नोंदवही (Family Register)
११. शासनाने जारी केलेले जमीन किंवा घर वाटप प्रमाणपत्र
१२. आधार कार्ड (केवळ ओळख सिद्ध करण्यासाठी)

मात्र ही यादी अंतिम किंवा मर्यादित नाही. त्यासमतुल्य (Equivalent) कागदपत्रेही स्वीकारली जाऊ शकतात.उदाहरणार्थ, एखाद्याकडे दहावीचे प्रमाणपत्र नसेल, तर शाळा सोडल्याचा दाखला (School Leaving Certificate), ट्रान्सफर सर्टिफिकेट किंवा त्यासमान इतर शैक्षणिक कागदपत्र स्वीकारले जाऊ शकते.आवश्यक असल्यास ERO संबंधित शासकीय विभागांकडून या कागदपत्रांची पडताळणी करेल

**प्रश्न क्र.१८ : मतदारांनावरील सर्व कागदपत्रे सादर करावी लागतील का?**
उत्तर :नाही.मतदाराने पात्रता सिद्ध करण्यासाठी फक्त एकच वैध कागदपत्र सादर करणे पुरेसे आहे.

**प्रश्न क्र.१९ : एखाद्या मतदाराचे मॅपिंग झालेले असले, पण त्यात काही विसंगती (Anomaly) आढळल्यास काय करावे?**
उत्तर :सुमारे 20 टक्के मॅपिंगमध्ये काही ना काही विसंगती आढळल्या आहेत.उदाहरणार्थ—
* आडनावात फरक असणे,
* एकाच नावाशी अनेक व्यक्तींची जुळवणी होणे,
* वय किंवा इतर तपशीलात तफावत असणे.
अशा वेळी ज्या मुद्द्यावर विसंगती आहे, त्यासंबंधित कागदपत्र सादर करावे लागेल.
उदाहरणार्थ—
* विवाहानंतर नाव बदलले असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र पुरेसे ठरू शकते.
* वयाबाबत तफावत असल्यास जन्म दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला ग्राह्य धरला जाऊ शकतो.

या प्रक्रियेचा उद्देश मतदाराला त्रास देणे नसून, संबंधित विसंगती दूर करणे व पात्र मतदाराचे नाव मतदार यादीत समाविष्ट करणे हा आहे.सादर केलेल्या कागदपत्रांबाबत ERO समाधानी असल्यास त्यानुसार पुढील कार्यवाही केली जाईल.

**प्रश्न २० : एखादी व्यक्ती तात्पुरती गावाबाहेर असेल किंवा कामानिमित्त दुसरीकडे राहत असेल तर काय?**
उत्तर :तात्पुरते स्थलांतर (Temporary Migration) हा कोणताही अडथळा नाही.जर एखादी व्यक्ती महिनाभरासाठी घराबाहेर असेल, तर तिच्या कुटुंबातील कोणताही प्रौढ सदस्य तिच्या वतीने Enumeration Form वर स्वाक्षरी करू शकतो.म्हणून केवळ तात्पुरते बाहेरगावी असल्यामुळे त्या मतदाराच्या पात्रतेवर कोणताही परिणाम होणार नाही.

**प्रश्न २१ : मतदार Enumeration Form ऑनलाइन भरू शकतात का?**
उत्तर :होय. ही सुविधा ECINET ॲप किंवाhttps://voters.eci.gov.in/वरउपलब्ध करुन देण्यात आली आहे. मात्र ऑनलाइन फॉर्म भरल्याने BLO कडून होणारी प्रत्यक्ष घरभेट व पडताळणी रद्द होत नाही.मतदाराने ऑनलाईन पध्दतीने फॉर्म भरून आवश्यक कागदपत्रे अपलोड केली, तरी BLO ला संबंधित मतदाराच्या घरी जाऊन पुढील बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करावी लागेल—
* मतदाराची ओळख
* राहण्याचा पत्ता
* अपलोड केलेल्या कागदपत्रांची सत्यता
यानंतर BLO आपल्या मोबाईल ॲपद्वारे पडताळणीची नोंद करून Enumeration Form व कागदपत्रे ERO किंवा AERO यांच्याकडे पुढील छाननीसाठी पाठवेल.
ऑनलाइन फॉर्म भरलेल्या आणि BLO कडून प्रत्यक्ष पडताळणी पूर्ण झालेल्या मतदारांची नावे मसुदा मतदार यादीत समाविष्ट केली जातील.

याचा अर्थ, ऑनलाइन अर्ज केला तरी प्रत्यक्ष घरभेटीद्वारे पडताळणी अनिवार्य राहणार आहे.

**प्रश्न २२ : शहरांमध्ये अनेक जण भाड्याच्या घरात राहतात आणि दिवसभर घरी नसतात. अशा मतदारांची पडताळणी कशी होणार?**

उत्तर :यासाठी BLO यांना आवश्यकतेनुसार संध्याकाळच्या वेळेतही घरभेटी देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.याशिवाय 29 जूनपासून ऑनलाइन सुविधाही उपलब्ध करण्यात आली आहे.तसेच ECINETमधील 'Book a Call' सुविधेच्या माध्यमातून मतदार BLO सोबत संपर्क साधण्यासाठी किंवा भेटीची वेळ निश्चित करण्यासाठी विनंतीही करू शकतात.

**प्रश्न २३ : ज्या मतदाराचे गणना प्रपत्र मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याकडे जमा होणार नाहीत त्यांच्याबाबत काय कार्यवाही अपेक्षित आहे?**

उत्तर :ज्या मतदारांचे गणना प्रपत्र विहित कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) याच्याकडे जमा होणार नाही, अशा व्यक्तिंचे नाव प्रारुप मतदार यादीत समाविष्ट होणार नाही.

**प्रश्न २४: कोणत्या कारणामुळे अशा प्रकारे गणना प्रपत्र परत प्राप्त होऊ शकणार नाही?**

उत्तर: सर्वसाधारणपणे चार कारणांमुळे गणना प्रपत्र पुर्णत: भरुन व स्वाक्षरी होऊन प्राप्त न होण्याची शक्यता आहे

* मतदार अनुपस्थित असणे (Absent)
* कायमस्वरूपी स्थलांतरित होणे (Shifted)
* मृत्यू झालेला असणे (Deceased)
* अन्यत्र मतदार म्हणुन नोंद झालेले (Already Enrolled)

अशा प्रकरणांमध्ये संबंधित व्यक्तींचे गणना प्रपत्र उपलब्ध न झाल्यामुळे त्यांची नावे प्रारूप (Draft) मतदार यादीत समाविष्ट केली जाणार नाहीत.

**प्रश्न २५: वरील कारणांमुळे प्रारुप मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट न झालेल्या व्यक्तींच्या नावांची यादी कुठे पाहता येईल?**

उत्तर: प्रारुप मतदार याद्या प्रसिध्द झाल्यानंतर, ज्या व्यक्तींची नावे वर नमूद कारणामुळे गणना प्रपत्र उपलब्ध न झाल्यामुळे प्रारुप मतदार यादीत समाविष्ट झाले नसतील अशा व्यक्तींच्या नावांच्या याद्या त्याबाबतच्या कारणांसह सार्वजनिक कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर उपलब्ध करुन दिल्या जातील. तसेच मान्यता प्राप्त राजकीय पक्षांच्या मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींना (BLA) सुध्दा उपलब्ध करुन दिल्या जातील. त्याचप्रमाणे अशा याद्या संबंधित जिल्हा निवडणूक अधिकारी तसेच राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

**प्रश्न २६ : SIR मुळे मतदारांची नावे कमी होणार आहेत अशा शंका उपस्थित केल्या जातात. हे खरे आहे काय?**

उत्तर :कोणताही पात्र मतदार मतदार यादीतुन वगळला जाणार नाही व कोणताही अपात्र मतदार मतदार यादीत समाविष्ट होणार नाही हे या SIR चे घोषवाक्य आहे. व त्यानुसारच हा कार्यक्रम पारदर्शकरित्या राबविला जाणार आहे.

**प्रश्न २७: संपूर्ण प्रक्रिया किती पारदर्शक असेल?**

उत्तर :या प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यात पारदर्शकतेची व्यवस्था करण्यात आली आहे.

अनुपस्थित/स्थलांतरित/मृत/अन्यत्र मतदार यादीत नाव असलेल्यामतदारांच्या याद्या सार्वजनिक कार्यालयांमध्ये प्रदर्शित केल्या जातील तसेच मुख्य निवडणूक अधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या संकेतस्थळांवर प्रसिद्ध केल्या जातील.राजकीय पक्षांच्या Booth Level Agents (BLA) यांनाही या याद्या देण्यात येतील आणि ते BLO सोबत संयुक्त पडताळणी करतील.जिथे आवश्यक असेल, तिथे घरभेटीदरम्यान घेतलेले छायाचित्रीय पुरावेही अपलोड केले जातील.या सर्व पडताळण्या, सुनावण्या आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल.

**प्रश्न २८: नागरीकांकडुन काय अपेक्षित आहे?**

**उत्तर:** मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण हा कार्यक्रमसध्या अस्तित्त्वात असलेल्या मतदार याद्या नव्याने अचुक व दोषविरहीत करण्यासाठी राबविण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता आपल्या घरी येणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना योग्य माहिती देऊन गणना प्रपत्र भरण्यासाठी संपूर्ण सहकार्य करणे आवश्यक आहे. कोणत्याही पात्र मतदाराचे नाव मतदार यादीतुन वगळण्यात येणार नाही.

**प्रश्न २९: स्वयंसेवी संघटनांकडुन काय मदत अपेक्षित आहे?**

उत्तर: हा कार्यक्रम राबविताना शहरी भागामध्ये तसेच काही असुरक्षित (vulnerable) गटातील मतदारापर्यंत मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना पोहोचण्यासाठी काही अडचणी येऊ शकतात. या करिता स्वयंसेवी संघटनांनी सदर राष्ट्रीय कर्तव्यात आवश्यकतेप्रमाणे मतदार नोंदणी अधिकारी तसेच मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्या समन्वयाने काम करावयाचे आहे.

**प्रश्न ३०: ज्या नागरिकांनी १८ वर्ष पुर्ण केलेली आहेत व ज्यांची नावे अद्याप मतदार यादीमध्ये समाविष्ट करण्यात आलेली नाहीत त्यांना या विशेष सखोल पुनरिक्षणामध्ये आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी संधी मिळणार आहे किंवा कसे?**

उत्तर:दिनांक १.१०.२०२६ पूर्वी १८ वर्ष पुर्ण झालेल्या सर्व नवमतदारांना आपले नाव मतदार यादीमध्ये समाविष्ट करण्यासाठी प्रारुप मतदार याद्या प्रसिद्ध झाल्यानंतर संधी उपलब्ध होणार आहे. त्यासाठी ECINET किंवा https://voters.eci.gov.in/या संकेतस्थळावर जाऊन फॉर्म-६ भरावा लागेल. अर्जासोबत आयोगाने विहीत केलेले घोषणापत्र जोडणे आवश्यक आहे.

**प्रश्न ३१: एखादी अनाथ व्यक्ती आपल्या आई-वडिलांचा वंशपरंपरेचा (Ancestry/Lineage) पुरावा सादर करू शकत नसेल, तर तिचे नाव मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी काय व्यवस्था आहे?**

उत्तर: अशा प्रकारच्या असुरक्षित (Vulnerable) गटांतील व्यक्तींनी भारत निवडणूक आयोगाने विहित केलेल्या दस्ताऐवजापैकी एक वैध दस्ताऐवज / कागदपत्र उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. असे दस्ताऐवज उपलब्ध झाले नाही तर विशेष कार्यपद्धती (Special Procedures) अवलंबण्यात येतील, जेणेकरून त्यांचे नाव पात्रतेनुसार मतदार यादीत समाविष्ट करता येईल.

**प्रश्न ३२: एखाद्या विवाहित महिलेचे २००२ नंतर विवाहामुळे आडनाव बदलले असल्यास तिने काय करावे? तिचे Mapping विवाहानंतरच्या नवीन आडनावाने २००२ च्या SIR शी होऊ शकेल का?**

उत्तर: होय. तिचे Mapping विवाहानंतरच्या नवीन आडनावाने करता येईल. तथापि, प्रणालीमध्ये ते"**Logical Discrepancy**"किंवा"**Anomaly**"म्हणून दर्शविले जाईल. अशा परिस्थितीत आडनाव बदलल्याचा आवश्यक पुरावा संबंधित महिलेने सादर करावा.

------------------------------------------------------------

**Special Intensive Revision (SIR) 2026**

**Frequently Asked Questions (FAQs)**

## Q1. What is the Special Intensive Revision (SIR) and what is its objective?

The Special Intensive Revision (SIR) is the process of preparing fresh Electoral Rolls to ensure that the Electoral Roll for Legislative Assembly constituencies in the State are accurate, complete, and free from errors. A Special Intensive Revision of Electoral Roll was conducted across the country during 2002–2004. Since then, factors such as rapid urbanization, migration of citizens, death of electors, and duplication of names have created the need to prepare fresh Electoral Rolls. Therefore, this programme is being implemented in phases throughout the country.

## Q2. When will this programme be implemented?

In Maharashtra, the programme will be conducted from 30 June 2026 to 19 October 2026, as per revised schedule declared by Election Commission of India.

- 30 June 2026 to 08 August 2026: Booth Level Officers (BLOs) will visit Electors' houses and collect Enumeration Forms.
- 17 August 2026: Draft Electoral Rolls will be published.
- 17 August 2026 to 16 September 2026: Claims and objections regarding the draft Rolls will be accepted.
- 17 August 2026 to 15 October 2026: Notices will be issued and action will be taken on claims and objections.
- 19 October 2026: Final Electoral Rolls will be published.

## Q3. What information has to be filled in the Enumeration Form?

The Enumeration Form will contain the elector's existing details from the current Electoral Roll in the first section.

The second section has two options:

- If the elector's name and details are found in the previous SIR list, they may be filled in through self-mapping.
- If such details are not found, the details of the elector's parents or grandparents from the previous SIR list may be filled in through progeny mapping.

The third section requires details such as date of birth, mobile number, Aadhaar number, and names of parents. The elector, or an adult member of the elector's family, must sign the form or affix a left thumb impression and submit it to the BLO.

## Q4. When was the previous Special Intensive Revision conducted in the country?

The previous Special Intensive Revision was conducted in different States across the country during the period 2002 to 2004.

## Q5. Why is information from the previous SIR being collected in the current revision?

As per the Constitution and Electoral laws, a person must be an Indian citizen to have his or her name included in an Electoral Roll. If a elector’s name appeared in the Electoral Rolls prepared during the 2002–2004 SIR, it indicates that the person was born before 1 July 1987, which is the first cut-off date under the Citizenship Act.

## Q6. What is expected from electors in this process?

Approximately 76% of electors have already been mapped with records from the previous SIR. During the home visit, the BLO will show the mapped details to the elector or an adult family member. After verification, the BLO will record the details in the Enumeration Form and obtain the signature of the elector or the family member. A copy of the filled form will be provided to the elector.

## Q7. What action is required if a elector’s record has not been mapped with the previous SIR?

The BLO will ask the elector for information related to the elector’s residence in 2002-2004, such as the State, district, constituency, or taluka. Based on this information, the BLO can retrieve the previous SIR details through the ECINet app or the https://electors.eci.gov.in/ portal.

Electors may also collect this information themselves from the app or portal before the BLO’s visit.

## Q8. What if the elector or an adult family member is not available at home during the BLO’s visit?

The BLO will visit the address mentioned in the Electoral Roll. If no elector or adult family member is available during the first visit, or if the house is locked, the BLO will leave a document containing his or her contact number at the residence.

The elector may contact the BLO and schedule a convenient time for completing the Enumeration Form. If no response is received, the BLO will make two additional visits.

## Q9. What happens if the Enumeration Form cannot be collected even after three home visits?

If the elector remains unavailable or is found to have shifted from the address after the final visit, a written record of the status will be maintained and noted on the Enumeration Form.

Such electors’ names will not be included in the draft Electoral Roll.

## Q10. What action will be taken regarding the Enumeration Form of a deceased elector?

Enumeration Forms will be prepared for all electors listed in the Electoral Roll. If a elector is found to be deceased during the home visit, the BLO will record the information based on details provided by relatives.

The form will be classified as “Uncollected – Deceased”, and the name of the deceased elector will not be included in the Electoral Roll.

## Q11. What care will be taken if a elector’s name is registered in more than one place?

Under Sections 17 and 18 of the Representation of the People Act, 1950, a person cannot be registered in more than once in Electoral Rolls. Section 31 provides that making a false statement or declaration regarding Electoral Roll registration may result in imprisonment for up to one year and/or a fine.

BLOs have been provided with photo-similar entries of electors whose names appear in more than one place. The elector should fill and sign only the Enumeration Form of the place where he or she is currently residing. The form for the other place will be marked “Already Enrolled”, and the name will not be included there.

Electors must ensure that they do not submit Enumeration Forms for more than one place.

## Q12. What documents are required to be provided along with the Enumeration Form?

The elector must fill and sign the Enumeration Form. If the elector’s details have not been mapped with the previous SIR records, the elector must keep ready one valid document from the list prescribed by the Election Commission.

## Q13. Is it necessary for a elector to provide a new photograph?

The current photograph available in the Electoral Roll is already included in the elector’s existing details. However, if the elector wishes to provide a new photograph, or if the existing photograph is unclear or unverified, the elector may submit a new photograph.

## Q14. Is it mandatory to provide a mobile number in the Enumeration Form?

Providing a mobile number is not mandatory. However, if a mobile number is provided, it will facilitate future online services such as applying for corrections in the Electoral Roll, downloading a Digital EPIC, and availing other online services.

## Q15. Is it mandatory to provide an Aadhaar number in the Enumeration Form?

No. The Aadhaar number may be provided voluntarily by the elector.

## Q16. What happens if a elector's 2002 Electoral Roll record cannot be mapped?

Such a elector must still sign and submit the Enumeration Form to the BLO. The elector's name will be included in the draft Electoral Roll.

However, the elector may subsequently be asked to provide one of the prescribed documents as proof. If the document is submitted and the Electoral Registration Officer (ERO) is satisfied after verification and hearing, the elector's name may be included in the final Electoral Roll.

To facilitate this process, 5 to 15 Assistant Electoral Registration Officers (AEROs) have been appointed with each ERO, so electors will not need to travel long distances for hearings.

## Q17. Which documents are included in the list of prescribed proofs?

The SIR guidelines specify the following 12 types of documents:

- Any Identity Card or Pension Payment Order issued to regular employees or pensioners of Central/State Government or Public Sector Undertakings (PSUs).
- Any Identity Card/ Certificate/Document issued in India by Government, local authorities, Banks, Post Offices, LIC or PSUs prior to 01.07.1987.
- Birth certificate issued by a competent authority.
- Passport.
- Matriculation/Educational certificate issued by a recognized board or university.
- Permanent Residence Certificate issued by a competent State authority.
- Forest Rights Certificate.
- OBC, SC,ST or any other caste certificate issued by the competent authority.
- National Register of Citizens (NRC), (where it exists)
- Family Register prepared by State / local authorities.
- Any land or house allotment certificate by Government
- Aadhaar card (for identity proof only).

This list is not exhaustive; equivalent documents may also be accepted. For example, if a elector does not possess a Class 10 certificate, a School Leaving Certificate, Transfer Certificate, or equivalent educational document may be accepted. The ERO may verify the documents with the concerned Government department if required.

## Q18. Is a elector required to submit all the prescribed documents?

No. The elector is required to submit only one valid document to establish eligibility.

## Q19. What should be done if a mapped record contains an anomaly?

About 20% of mapped records have some form of discrepancy, such as:

- Difference in surname,
- Mapping of multiple persons to the same name,
- Difference in age or other details.

In such cases, the elector must submit a document related to the specific discrepancy. For example:

- If the surname has changed after marriage, a Marriage Registration Certificate may be sufficient.
- If there is a discrepancy in age, a Birth Certificate or School Leaving Certificate may be accepted.

The purpose of this process is not to inconvenience electors, but to resolve discrepancies and ensure that eligible electors are included in the Electoral Roll. If the ERO is satisfied with the submitted documents, further action will be taken accordingly.

## Q20. What if a person is temporarily staying outside the village or residing elsewhere for work?

Temporary migration is not a disqualification. If a person is away from home for a temporary period, any adult member of the family may sign the Enumeration Form on his or her behalf. Therefore, temporary absence from the usual place of residence will not affect the elector's eligibility.

## Q21. Can electors fill the Enumeration Form online?

Yes. The facility is available through the ECINET app or https://electors.eci.gov.in/ .

However, submission of the online form does not replace the BLO's home visit and physical verification. Even if the elector fills the form online and uploads documents, the BLO must visit the elector's residence to verify:

- The elector's identity,
- The residential address,
- The authenticity of uploaded documents.

After verification, the BLO will record the verification in the mobile app and forward the form and documents to the ERO/AERO for scrutiny. Electors whose online forms are successfully verified by the BLO will have their names included in the draft Electoral Roll.

## Q22. How will verification be conducted for electors living in rented houses in urban areas and who are not available at home during the day?

BLOs have been instructed to conduct home visits in the evening if necessary. In addition, the online facility has been available since 29 June 2026. Electors may also use the "Book a Call" feature in ECINET to contact the BLO and schedule a convenient visit.

## Q23. What action will be taken if an Enumeration Form is not submitted to the BLO?

If a elector's Enumeration Form is not submitted within the prescribed period, the elector's name will not be included in the draft Electoral Roll.

## Q 24. For what reasons may an Enumeration Form remain uncollected?

Generally, an Enumeration Form may remain uncollected for the following reasons:

- Absent – the elector was not available.
- Shifted – the elector has permanently migrated.
- Deceased – the elector has passed away.
- Already Enrolled – the elector is already registered elsewhere.

In such cases, the elector's name will not be included in the draft Electoral Roll due to non-availability of the completed Enumeration Form.

## Q25. Where can the list of persons whose names are not included in the draft Electoral Roll be viewed?

After publication of the draft Electoral Roll, lists of persons whose names have not been included due to non-availability of Enumeration Forms will be displayed on the notice boards of public offices, along with the reasons for exclusion.

These lists will also be made available to recognized political parties' Booth Level Agents (BLAs) and published on the official websites of the District Election Officer and the Chief Electoral Officer of the State.

## Q26. Is it true that electors' names will be deleted because of the SIR?

No. The guiding principle of the SIR is that no eligible elector shall be excluded from the Electoral Roll, and no ineligible elector shall be included. The programme will be implemented in a transparent manner in accordance with this principle.

## Q27. How transparent will the entire process be?

Transparency has been ensured at every stage of the process:

- Lists of absent, shifted, deceased, and already-enrolled electors will be displayed in public offices and published on the websites of the Chief Electoral Officer and District Election Officers.
- These lists will also be provided to political parties' BLAs, who will conduct joint verification with the BLOs.
- Where necessary, photographic evidence collected during home visits will be uploaded.
- The final Electoral Roll will be published only after completion of all verifications, hearings, and legal procedures.

## Q28. What is expected from citizens?

The Special Intensive Revision is being conducted to prepare fresh, accurate, and error-free Electoral Rolls. Citizens are requested not to believe rumours and to cooperate fully with BLOs by providing correct information and assisting in the completion of Enumeration Forms.

No eligible elector's name will be deleted from the Electoral Roll.

### Q29. What assistance is expected from voluntary organizations?

During the implementation of this programme, BLOs may face difficulties in reaching electors in urban areas and vulnerable groups. Voluntary organizations are expected to coordinate with Electoral Registration Officers and Booth Level Officers and provide necessary assistance in this national duty.

### Q30. Will citizens who have completed 18 years of age and whose names are not yet included in the Electoral Roll get an opportunity to register?

Yes. All new electors who attain the age of 18 years on or before 1 October 2026 will have an opportunity to apply for inclusion of their names after publication of the draft Electoral Rolls.

They must submit Form 6 through the ECINET app or https://electors.eci.gov.in/, along with the declaration prescribed by the Election Commission.

### Q31. What provision exists for an orphan who cannot produce proof of ancestry or lineage?

Persons belonging to such vulnerable groups must provide one valid document from the list prescribed by the Election Commission. If such documents are not available, special procedures will be followed to ensure that their names can be included in the Electoral Roll according to eligibility.

### Q32. What should a married woman do if her surname changed after marriage and the change occurred after 2002?

Yes, her record can be mapped with the new surname acquired after marriage. However, the system may flag it as a “Logical Discrepancy” or “Anomaly”. In such cases, the concerned woman should submit the necessary proof of surname change, such as a marriage-related document.

-------------------------------------------------